**नि.फौ.ख.क्र.१२१/२०२४**
सरकार – वि.- प्रकाश
**निशाणी क्र. २०**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र.३ -**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – अशोक लालासाहेब पायाळ ( जप्ती पंच )
वय – ३५ वर्षे, व्यवसाय – मजुरी
सध्या रा. - ताडीवाला रोड, पुणे.

**सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती ए.एस.काळे यांचेमार्फत शपथेवर सुरु-**

दि.०९/०१/२०२४ रोजी पुणे लोहमार्ग पोलीस स्टेशनचे हवलदार कांबळे यांनी मला पंचनाम्याकामी लोहमार्ग पोलीस स्टेशन येथे बोलाविले होते. ट्रेसींगवरुन एक इसम त्यांनी ताब्यात घेतला होता. माझे सोबत दुसरा पंच रघुनाथ गायकवाड हजर होता. मी गेलो तेव्हा माझे समक्ष त्यास नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव प्रकाश मुखीया असे सांगितले. त्याने त्याचे ताब्यातील मोबाईल हजर केला. मोबाईल सॅमसंग कंपनीचा आकाशी निळया रंगाचा होता. पोलीसांनी तो जप्त करुन जप्ती पंचनामा तयार केला. पंचनामा आम्हाला वाचुन दाखवला. त्यानंतर मी त्यावर सही केली. आता मला जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. तो तोच असुन त्यावर माझी, दुसरा पंच गायकवाड, पोलीस व आरोपीची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. २१** देण्यात येतो.

२. ज्या व्यक्तीच्या ताब्यातुन मोबाईल जप्त करण्यात आला तो व्यक्ती आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण .**

**आरोपीतर्फे साक्षीदाराचा उलटतपास विधीज्ञ श्री.ए.टी.नावडकर यांच्यामार्फत सुरु-**

३. मला कांबळे साहेबांनी फोन करुन बोलावले होते. माझा व त्यांचा चांगला संपर्क आहे. या अगोदर मी पंच म्हणुन पोलीस स्टेशनला गेलेलो आहे तसेच न्यायालयात साक्ष देखील दिलेली आहे. हे

म्हणणे खरे आहे की, मी गेलो तेव्हा पोलीस स्टाफ व आरोपी तेथे हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यावर मी न वाचता सही केली. मला जप्त मोबाईलचे मॉडेल नंबर व आयएमईआय क्रमांक सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे समक्ष आरोपीच्या ताब्यातुन मोबाईल जप्त करण्यात आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2025.09.23 17:26:07 +0530

**(एन.जे.चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.
दि. २३/०९/२०२५